# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते



## चला! आपण सगळे एक होऊन गोवरला प्रतिबंध करूया

### गोवर

गोवर हा विषाणूमुळे होणार अत्यंत संसर्गजन्य रोग आहे.
५ वर्षाखालील मुलांमध्ये लसीकरणामुळे टाळता येणाऱ्या आजारांपैकी गोवर एक आजार आहे.
गोवरचा प्रसार रुग्ण खोकताना आणि शिंकताना पडलेल्या थेंबांद्वारे इतरांना होतो.
जवळच्या संपर्कातील ९०% लोकांना हा आजार होऊ शकतो हा इतका संसर्गजन्य रोग आहे.

### गोवर ची लक्षणे



तीव्र ताप



अंगावर पुरळ



खोकला



वाहणारे नाक



डोळ्यातून पाणी आणि डोळे लाल होणे

**गोवर ची लक्षणे आढळ्यास त्वरित म. न. पा आरोग्य केंद्र किंवा दवाखाना किंवा रुग्णालयाशी संपर्क साधावा**

### गोवर मूळे होणाऱ्या गंभीर समस्या

बाळांना गोवर झाल्यावर आरोग्याच्या गंभीर समस्यादेखील उद्भवू शकतात जसे कि, न्यूमोनिया, जुलाब, कानाचा संसर्ग, डोळ्याचा संसर्ग, मेंदू संसर्ग आणि प्रसंगी मृत्यू देखील होऊ शकतो.



निमोनिया



अतिसार



कानाचा संसर्ग



डोळ्याचा संसर्ग



मेंदू संसर्ग

# गोवर टाळता येऊ शकतो

बाळाला गोवर ची लस ९ महिने पूर्ण झाल्यावर आणि दुसरा डोस वय १६ महिने पूर्ण झाल्यावर लगेच द्या.

आपल्या बाळाला गोवर लसीचे दोन डोस आणि 'अ' जीवनसत्वाची पूरक मात्रा मिळाली आहे का याची खात्री करून घ्या.

आणि समजा लसीकरणाचा डोस चुकला असेल तर बाळाच्या ५ वर्ष वयापर्यंत लसीकरण पूर्ण करता येते.

# गोवर चा प्रसार कसा रोखता येऊ शकतो?

गोवर संक्रमित रुग्णांनी घराबाहेर पडू नये , संक्रमित बालकांना अंगणवाडी अथवा शाळेत पाठवू नये जेणेकरून इतर बालकांना याचा संसर्ग होण्यापासून रोखता येईल.

गोवर संक्रमित रुग्णाने व्यक्तिगत स्वच्छता ठेवावी तसेच खोकताना आणि शिंकताना रुमालाचा वापर करावा.

गोवरसाठी लसीकरण हा अत्यंत प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. त्यामुळे योग्य वयात बालकांचे लसीकरण होणे आवश्यक आहे. लसीकरण न झालेल्या रुग्णांमध्ये गोवर जास्त प्रमाणात बळावत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आपल्या बाळाचे संरक्षण ही गोवर ची लस देऊन करणे आवश्यक आहे.

# गोवर संक्रमित बाळांमध्ये धोक्याची लक्षणे पुढील प्रमाणे आढळ्यास त्वरित म. न . पा आरोग्य केंद्र/दवाखाना/ रुग्णालयाशी संपर्क साधा.



**तीव्र ताप**



**श्वासोच्छवास वेगाने होणे**



**श्वास घेताना छाती आत ओढली जाणे**



**सुस्ती किंवा हालचाल न करणे**



**कधी कधी आकडी येणे**

# गोवर लसीकरण

- गोवर पासून संपूर्ण संरक्षणासाठी प्रत्येक बाळाला गोवरच्या २ लसी योग्य वयात मिळणे अत्यावश्यक आहे. पहिला डोस वय ९ महिने पूर्ण झाल्यावर लगेच आणि वय १२ महिने पूर्ण झाल्यावर लगेच द्या.

  **आणि समजा लसीकरणाचा डोस चुकला असेल तर बाळाच्या ५ वर्ष वयापर्यंत लसीकरण पूर्ण करता येते**

- सद्य परिस्थितीत मुंबई मध्ये गोवर ची साथ पसरत आहे हे लक्षात घेता, गोवर लसीचा अतिरिक्त डोस ९ महिने ते ५ वर्ष वयोगटासाठी देण्यात येत आहे.
- अति-जोखमीच्या परिसरात विशेष लसीकरण ६ ते ९ महिने वयोगटातील बाळांसाठी करण्यात येत आहे. (ज्या परिसरात गोवर रुग्णांचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, तेथे ९ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या बाळांसाठी अतिरिक्त डोस देण्यात येत आहे).
- गोवर लसीचा अतिरिक्त डोस आधी केलेल्या लसीकरणाच्या ४ आठवड्यांनंतर देऊ शकता.
- गोवर लसीकरणासोबत बाळाला जीवनसत्व 'अ ' ची पूरक मात्रा मिळाली आहे का याची खात्री करून घ्या.

# गोवर ला हरवूया हे लसीकरण नक्की करूया

@mybmchealth   mybmchealth   Mybmcphd

